ISSN No: 0474-9030 (Print)

# Our Heritage Journal

Volume: 68, Issue: 68, Year: 2020 (January)

Peer Reviewed Refereed Research Journal

UGC Care Listed Journal

Published by:

Department of Postgraduate Training and Research

Sanskrit College

19-20

# OUR HERITAGE JOURNAL

**ISSN No: 0474-9030** **UGC Care Listed Journal**

**UGC Care Approved International Indexed and Referred Journal**

**IMPACT FACTOR: 4.912 (SJIF)**

15. COINAGE TRADITION OF MUGHAL EMPEROR JAHANGIR
*Danish Moin* 81

16. SUSTAINABLE PRODUCT DEVELOPMENT USING GHISA SILK: A CASE FOR DESIGN EDUCATORS
*Dr. Vandana Jaglan* 84

17. ANALYSIS OF CORPORATE SOCIAL RESPONSIBILITY ACTIVITIES UNDERTAKEN BY INDUSTRIAL UNITS DURING COVID 19
*Ms Jalpa A. Patel, Dr. Rekha kumari R. Singh* 88

18. FACTORS RESPONSIBLE FOR ACROSS REGION MARRIAGES: A SOCIOLOGICAL STUDY IN REFERENCE TO WESTERN UTTAR PRADESH
*Dr. Devendra Pal Singh Tomar* 92

19. CONCEPTUALIZING INDO-EUROPEAN RACIAL AFFINITY: THE CASE OF EARLY ORIENTALISM IN INDIA
*Dr. Makkhan Lal Nayak* 94

20. 5 ट्रिलियन डॉलर की अर्थव्यवस्था की ओर!
डॉ उमेश प्रताप सिंह 97

21. QUESTIONING THE STATE OF EMERGENCY IN INDIA: NAYANTARA SAHGAL'S RICH LIKE US
*Parmjeet Kaur* 105

22. IMPACT OF FOOD SAFETY KNOWLEDGE AND FOOD PRACTICES ON FOOD ATTITUDE
*Monika Rana, Parneet Singh Bhasin* 108

23. गावगाडा: मातंग स्त्रियांचे स्थान
प्रा. डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे 114

ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

# गावगाडा: मातंग स्त्रियांचे स्थान

**प्रा. डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे**

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, मा. श्री. अण्णासाहेब डांगे महाविद्यालय,
हातकणंगले जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

भारत हा शेतीप्रधान व खेड्यांचा देश आहे. भारतीय समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीशी संबंधित आहे.पूर्वीच्या काळी ही खेडी स्वयंपूर्ण होती. त्या काळी त्यास गावगाडा म्हणत असत. गावगाडा या शब्दात सगळी प्राचीन भारतीय समाजव्यवस्था सामावली आहे. भारताच्या प्राचीन संस्कृतीचे प्रतिबिंब आजही गावगाड्यात दिसते. भारतात अनेक देशी विदेशी राज्यकर्त्यांनी राज्य केली पण या समाज व्यवस्थेमध्ये कोणतेही बदल झाले नाहीत. इंग्रजांच्या काळात मात्र यात बदल व्हायला सुरूवात झाली. स्वातंत्र्यानंतर आजही गावगाडा आर्थिक दृष्टीने बदललेला दिसतो पण धार्मिक बाबतीत मात्र मोठे बदल झाले नाहीत. गावगाड्यात जाती व्यवस्था, जातीची वतन परंपरा व त्यानुसार मिळणारे बलुतं व त्या अनुषंगाने त्या-त्या जातीस प्राप्त होणारे हक्क-लाजिमाही गावाची आर्थिक व सामाजिक परंपरा होती. या परंपरेला धर्माचे अधिष्ठान होते. या भोवती व्यक्तीचे जीवन केंद्रित झालेलेहोते. गावगाड्यातील या घटकांस या गोष्टीच्या बाहेर जाऊन कोणताही विचार व कार्य करण्याची मुभा अथवा परवानगी नव्हती. अशा समाजातमहाराष्ट्रातील कृषी प्रधान ग्राम रचना आणि त्या रचनेत होणारी विविध कामे, प्रशासनाची परंपरा, गावातील शेतकरी व शेतीविषयक कामे करणारे कारू नारू त्यांच्या श्रेणी आणि परस्पर संबंध यांची सखोल चर्चा आत्रे यांनी 'गावगाडा' या त्यांच्या ग्रंथातून केली आहे.

भारतीय स्त्री ही या सर्व जात-निहाय श्रेणी बद्धसामाजिक स्थितीत जखडलेलीअसल्यामुळे या स्त्रियांचा एकसंघ घटक म्हणून अभ्यास करणे व त्यांच्या लिंगभावाच्या जडण-घडणीचा इतिहास लिहिणे अत्यंत अवघड आहे. भारतातील स्त्रियांचा गट एकजिनसी नाही तर त्या जाती-जातींमध्ये विभागल्या गेल्या आहेत. स्त्रियांचे जीवन जातीने नियंत्रित केले आहे. त्याच्या अधिकार कक्षा जातीनुसार ठरतात. अशाजातीसंस्थेवर आधारित समाज रचनेमध्येगावगाड्यांतील विविध जातींच्या स्त्रियांचे स्थान कोणते होते? त्यांच्या कामाचे स्वरूप चूल आणि मूल एवढे मर्यादीत होते की त्या सार्वजनिक कामांमध्ये सहभाग घेत होत्या? त्यांच्या जाती कुळाचारानूसार गावगाड्यांमध्ये त्यांना काही हक्कलाजिमा होत्या का? याचे चित्र उपलब्ध साधनांमधून मिळत नाही. मात्र काही संदर्भ मिळतात ते त्यांच्या पोटासाठी राबत असलेल्या कामाचे! काही अस्पृश्य स्त्रिया पोटाची खळगी भरण्यासाठी स्वतःची जात लपवून व्यावसाय करीत. पण काही काळानंतर त्यांची जात कळत असे व

Copyright Ⓒ 2020Authors

ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

पुन्हा त्यांना उपासमार अवहेलना व शिक्षेला तोंड द्यावे लागे. त्यांना बटीक म्हणून रहावे लागे. पेशवे मोहिमांसाठी किंवा प्रांत खरेदीसाठी जेव्हा निघत तेव्हा त्यांना प्रत्येक गावांगावातील कुणबिणी आणि महारणी ओवाळत असत.[1] त्या गावगाड्यांत मोलमजुरी करून स्वत: पोट भरणाऱ्या स्त्रिया होत्या. यातील काही स्त्रिया बटकीन, कुणबीण, नाची, कलावंतीण अशी कामे या स्त्रिया करीत असत. पण या कामांचा त्यांना पैशामध्ये मोबदला मिळत असे की नाही, मिळाल्यास किती मिळत असे व आपल्या कमाईचे त्या काय करीत याचे उल्लेख वाचायला मिळाले नाहीत. असा उल्लेख निलिमा भावे करतात.[2]असे स्त्रियांविषयीचे त्रोटक उल्लेख मिळतात पण प्रत्यक्षात मात्र गावगाड्यातील स्त्रिया त्यांच्या जातीच्या व्यवसायामध्ये योगदान देत आल्या आहेत पण त्याच्या या कामाची दखल, तसेच त्यांच्या हक्क-लाजिमा याची दखल गावगाड्याचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी घेतली नाही.

**उद्दिष्ट :**

गावगाड्यांतील मातंग जातीतील स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा करणे, त्याच्या कामाचे व त्यांच्या हक्कलाजिमा यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती, निरीक्षण पद्धती व मुलाखत तंत्राचा वापर केला आहे.

**वतन पद्धतीची आत्रे यांनी केलेली व्याख्या :**

वतन म्हणजे जात धंदा, वंशपरंपरागत काम, चाकरी, नेमणूक उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क, वडिलोपार्जित मिळकत, स्थावर अगर स्थावरतेच्या योग्यतेची जंगम मालमत्ता, जन्मभूमी या सर्वांना वतन शब्द लावतात. कोणताही वंशपरंपरागत हक्क म्हणजे वतन होय. जात आणि जातीचा धंदाही वंशपरंपरागत असतो. त्यामुळे जाती संबंध हक्क आणि कर्तव्य यांचा सामावेशही आत्रे यांच्या दृष्टीने वतन पद्धतीतच होतो. आर्थिकदृष्ट्या पाहिले तर जातीसंस्थेचे प्रतिबिंब बलुते पद्धतीत पडलेले आहे.[3]

**गावगाड्यातील मातंग व्यक्तीचे काम:**

मांग किंवा मातंग हागावगाड्यातील महत्वाचा बलुतेदार शेतीसाठी नित्य लागणारी दावी(दोर), कासरे, मुंगसी, गोफण, नाडा, सौंदर, दोऱ्या, सोल, संवदर, दावण, आसूड आदी वळून देण्याचे काम मातंग बलुतेदार करीत असे. मातंग बलुतेदार बाज (नारळाच्या दोराने विणकाम केलेली लाकडी खाट) व पाळणेविणण्याचे कामही करीत. पोळ्यासाठी बैलाच्या शिंगांना बांधावयाचे गोंडे देखील मांग बनवत असत. फडे बनविणे, गावात गस्त घालणे, दवंडी देणे, इ. कामे करीत असे. वरातील लग्न समारंभामध्ये हलगी वाजवण्याचे काम मांग करीत असे. वरातीत बत्ती घोडे पकडण्याचे काम मांग

Copyright © 2020Authors

ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

पुरूष करीत असे. तसेच प्रेताची अंतयात्रा निघाली असताना त्या समोरही हलगी वाजवण्याचे काम त्याला करावे लागे. मांग पुरूष स्मशानात गौऱ्या नेण्याचे काम करत.[4]मृताचा सांगावा देण्याचे काम ही महारा प्रमाणे मांगांनाही करावे लागे. असा सांगावा घेऊन गेल्यावर मांगाला भाकरी तिच्यावर थुंकून मगच ती त्याला दिली जायची. मेलेल्या जनावराची विल्हेवाट लावण्याचे काम ही महाराप्रमाणे मांगही करत. यावरून दोघांत त्यावरून तंटेही उदभवत असत, असे सोजराबाई यांनी मुलाखती दरम्यान सांगितले.[5]

**बलुत्याचा निखार**

मांगांना द्यावयाचे बलुते सर्व ठिकाणी एकसारखे नव्हते. खळे चालू असताना मांग खळ्यावर गेला असता त्याला पाच पेंढ्या कडबीअथवा धान्य मिळे. परभणी जिल्हयात औतामागे चार पायली पर्यंत धान्य किंवा शेतकऱ्यांचे उत्पन्न एक खंडी धान्या इतके असल्यास एक ते दोन पायली धान्य देण्याची पद्धती आहे.

**गावाच्या सांस्कृतिक जीवनात मातंगाचे स्थान व हक्क लाजिमा:**

पोळ्याच्या सणाला मांगाला गावाच्या वेशीला तोरण बांधण्याचा मान असे. असामीला बैलाच्या खांदे मळणीसाठी मोळ दिल्यानंतर त्यांना गूळ कण्या किंवा सण वाढून मिळायचा. तसेच आसामीच्या गुरांचागोठा स्वच्छ करून त्यालाही तोरण बांधावे लागे. या बदल्यात त्या दिवशी मांगाला जेवण मिळायचे.

**आमावस्यामागणे**:

वेळ-अमावस्येलाम्हसोबाला नैवेद्य दाखवल्यानंतर मांगाला जेवण देत व त्यानंतरच इतरांनी जेवण करायचे असा नियम होता. पण हे जेवण मांगाने घराबाहेर बसूनच करावयाचे आहे. प्रत्येक अमावस्येला तेलाची धार मिळायची. आषाढ महिण्यात मंगळवारी, शुक्रवारी व आमावस्याला या दिवशी मरीआई जवळ ठेवलेला फळ-मुटका, खारीक, वाटी(नारळाची), हळकुंड मांगास मिळे ते त्यांच्या स्त्रिया हे सर्व जमा करण्याचे काम करत.

**मरीआईचा गाडा** :

मरीआई ही अजाराची देवता आहे तिचा कोप झाल्यावर पटकी (कॉलरा), गड्डा उठणे(प्लेग), देवी अशा रोगाचा प्रादूर्भाव होतो. या मरीआईचा गाडा गावाच्या शिवावर (सिमेवर) राहिल्यास पाऊस येते नाही अशीही समजूत होती. अशा मरीआईचा गाडा गावाच्या शिवावर मांगाने राहू द्यायचा नाही. गावाच्या शिवावर आणून सोडलेला मरीआईचा गाडा गावातील मांग ओढून दूसऱ्या गावाच्या शिवावर नेऊन ठेवतो. तो गाडा पुन्हा त्या गावाचा मांग पुढच्या गावास नेऊन ठेवतो. ही प्रकिया चालू असायची.

Copyright © 2020Authors

ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

स्त्रिला मुल न होणे आजारी असणे अशा वेळी मरीआईजवळ हल्या सोडला जायचा हा हल्या गावात खाऊन पिऊन धष्टपुष्ट झाल्यावर त्याचा बळी मरीआईला दिला जायचा. या धार्मिक क्रियेला 'कारण' असे म्हणत. मुलाखतीच्या वेळी सोजराबाई यांनी सांगितले की आता आम्ही या प्रथा पाळत नाही. बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गाने आम्ही पुढे जात आहोत.[6]

ग्रामीण समाजात म्हसोबाला कोंबड्या बकऱ्याचा बळी देण्याची प्रथा होती. हे बळी शेतामध्ये दिले जायचे. निवद म्हणून देवापुढे ठेवलेली भाकरी, पुजलेलं कालवन (आमटी) तेवढं मिळायचं. मुलाची शांती करावयाची असल्यास मुलाच्या अंगावरून दिवा उतरून(ओवाळून) तो मांगाकडून नदीमध्ये विसर्जित केला जायचा. हे कामही मांगाला करावे लागे. या बदल्यात मांगाला जेवण मिळत असे. हे काम मात्र पुरूष करत.

**ग्रहण**:

चंद्र व सुर्य ग्रहणावेळी मांगाला गिराण (ग्रहण) मागण्याचा अधिकार होता. गिराणात त्यांना धान्य व जुने कपडे मिळत पण हे धान्य बऱ्याच वेळा गोंडच(निकृष्ट) असे या धान्यात नखे व अंगावरचे जुने कपडे टाकून दिले जात याचा अर्थ असा होतो कि त्यांचा गिरा (अनिष्ट/ सर्व नकारात्मक गोष्टी) मांगावर जावोत.[7]

**जातीच्या व्यवसायात मातंग स्त्रियांचे कार्य :**

**1) दोर बनवण्याची प्रक्रिया**

गावातील शिवारातून शेताच्या बांधावरून केकताड ( घायपात) इळ्याने कापून भारा बांधायचा, तो डोक्यावर घेऊन नदीवर जायचे. केकताड नदीच्या पाण्यात दहा बारा दिवस भिजू घालायचे. त्यानंतर केकेताड निरपून काढावयाचे. त्याला चांगले धुवून काढायचे त्या नंतर वाळवायचे, बडवायचे. येवढ्या प्रक्रियेनंतर केकताडाचे धाग्यात रूपांतरण व्हायचे. त्यानंतर ते घरी आणून दोर करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात व्हायची. दोर बनवण्यासाठी गिरका घ्यावा लागायचा (सुताला पीळ देणे). पीळ दिलेल्या दोराचे पदर एकत्र करून मोठी दोरी बनवत. या प्रक्रियेला आटाने असे म्हणतात. पीळ दिलेल्या दोरीपासून दोराचे विविध प्रकार तयार केले जातात. कासरा तीन पदराचा असतो. काणी ही जनावराला मेकिला बांधण्याची दोरी आहे. शिके (शिंके) व मुंगसेही (जनावराने उभे पीक खाण्यास प्रतिबंध करण्यासाठी तोंडावर जाळीदार विणलेला दोर) तयार केले जातात. शिंके महत्त्वाचे अन्नपदार्थ वर उंचीवर अधांतरी टांगून ठेवण्यासाठी वापले जाते. तर मुंगसे जनावराचे तोंड बांधून ठेवण्यासाठी वापरतात. आंबाड्याचा उपयोगही दोरी बणवण्यासाठी केला जात असे. आंबाड्या सोलून नदीच्या डोहात भिजत घालायच्या दहा दिवसानंतर पाण्यातून काढून बडवायच्या त्याच्या तागापासुन कासरे,

Copyright © 2020Authors

ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

काण्या तयार केल्या जातात. या सर्व प्रक्रियेमध्ये स्त्रियांचे योगदान असायचे. प्रामुख्याने गिरका घेण्याचे काम स्त्रिया करत.[8]

**2) फडे (झाडू) बनवणे**

फडे बणवण्यासाठी सिंदोळ्याच्या (सिंधी) झाडाचा उपयोग करतात. स्त्रिया सिंदोळ्याच्या फांद्या कापून डोक्यावर भारा बांधून आणतात. या आणलेल्या फांद्या प्रथम वाळवतात. वाळल्यानंतर त्याचे काटे काठीने (टिकराने) झाडून काढायचे. त्या नंतर त्याच्या खणग्या ( शिंदोळ्याच्या फांद्याचे फड्याला आवश्यक असे छोटे तुकडे पाडायचे त्याला खणग्या पाडणे असे म्हणतात) बनविणे, या खणग्यापासून फडे बांधायचे काममात्र पुरूष करतात. हे फडे बाजाराला नेण्याचे काम पुरुष करतात. फडा असामीच्या घरी दिल्या नंतर त्या बदल्यात आठवाभर (शिवकालीन मापे) दाळ मिळायची किंवा भाकरी दिली जायची. लक्ष्मी पुजनाच्या वेळी फडा असामीच्या घरी द्यावा लागे. या दिवशी फड्याची लक्ष्मी म्हणून पुजा केली जाते. या बदल्यात मांगाला सण वाढून मिळायचा. सण वाढून आणण्याचे काम स्त्री-पुरूष करत. नव्या फड्या सोबत जुन्याफड्याची ढिली झालेली मुठही बांधून देण्याचं काम करावे लागे. यासाठी मात्र शिळी किंवा ताजी भाकरी मिळे. शेतात खळे झाल्यावर धान्याच्या राशीची पोती भरल्यावर मांग स्त्रिया खळ्यावर 'बीकण वाढा' असे म्हणून मागायला जात. त्या वेळी त्यांना किलो, दोन किलो धान्य मिळत असे. हे बीकणबलुत्याच्या व्यतिरिक्त असे.

पोळ्याच्या सणाला बैलाच्या खांदा मळणीला मोळ द्यावा लागे. हा मोळ देण्याच काम मांगाला करावे लागे. मोळाच्या गड्ड्या (पेंढ्या) बांधण्याचे काम स्त्रिया करीत. मोळ म्हणजेलव्हाळ्या सारखे एक प्रकारचेमऊ, मुलायम गवताचा प्रकार.हे गवत ओढ्यामध्ये उगवते. या मोळाने बैलाची खांदा मळणी केली जाते. या मोळाच्या दोरीचा उपयोग तोरणासाठी केला जात होता.[9]

**स्त्रियांचे सांस्कृतिक जीवन :**

**1) दायीचे (सुईनीचे) काम:**

मातंग स्त्री दाईचे काम करत असे.मांगिणी द्वारे जन्मत: बाळाचे कान फुंकून मंत्रोच्चार करणे शुभ मानले जाई. (बाळंत स्त्रीचा विटाळ पाळण्याची प्रथा वरिष्ठ समाजामध्ये आहे.बाळंत स्त्री व बाळ याला घरातील मंडळी सव्वा महिना स्पर्श करीत नसत.) या काळात बाळ व बाळंत स्त्रीचे कामे मातंग स्त्री करीत असे. या कामामध्ये बाळंतपण करणे, बाळ व बाळंतीनीची मालीश करणे, बाळंतीनीचे कपडे धुणे, तसेच गावातील विटाळशी स्त्रियांचे कपडेही तिला धुवावे लागत.[10]

Copyright © 2020Authors

 ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

आसामीच्या घरी दिवाळीला अंघोळीच्या वेळी हलगी व ढोल वाजवण्याचे काम मांगाला करावे लागत होते. तर काही ठिकाणी दिवाळीच्या सणात मातंग स्त्री गावातील प्रतिष्ठित पुरूषांना (पाटील) आरती घेऊन ओवाळतात. 'इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो', असे म्हणतात.[11]

विवाह समारंभात नवरदेवाला वेशीत ओवाळण्याचा हक्क मांगिणीचा असे.त्या वेळी तिला खण, नारळ सुपारी देण्याची रीत होती.[12]

**मांगाच्या उपजाती व जातीवरील म्हणी :**

'मांग भेटल, पांग फिटल' व 'मांग अन् भलतीच खबर सांग' अशा काही मातंग जातीवरच्या म्हणी त्यांनी सांगितल्या. मांग जातीतही उपजाती आहेत. मांग गारूडी, डक्कलवार आणि कोकीलवार या मांगाच्या खालच्या जाती आहेत. या जाती पुराणे सांगतात, मोर नाचवतात असे त्यांनी मुलाखती दरम्यान सांगितले. खंडोबा, मरीआई, अंबाबाई व मांगीरबुवा ही त्यांची कुलदैवत आहेत. मांगाचे लग्न पूर्वी पाच दिवसाचे होते. ब्राह्मण लग्न लांब बसून लावत असे. त्याला त्या बदल्यात एखादा रूपया दिला जायचा. ब्राह्मण कोरडा शिधा मात्र घेत नसत.

मांग स्त्रियांमध्ये घटस्फोटाची प्रथा होती. बहुतेक वेळा स्त्रियांचे दुसरे लग्न हे अमावशेच्यादिवशी गाठ मारून होत असे. अशा स्त्रियांना सुवासिनीचा मान नसे. अशा विवाहास समाजात प्रतिष्ठा नसे.'कुंकूपुसून शेण लियाचं का?' असे म्हटले जाई. त्यामुळे दुसरे लग्न नको म्हणून स्त्रिया सासरचा जाच काढायच्या. घरात मुलाच्या जन्माचे स्वागत केले जात असे. फक्त मुलाचं बारस घातलं जाई, मुलीचे मात्र बारसे केले जात नसे. मुलगी वयात आल्यास तिची ओटी भरली जाते.

संक्रातीच्या सणाला मांग स्त्रिला सर्वात प्रथम कुंकू लावतात. तर सवास्न घालण्याची प्रथा सर्व जातीच्या स्त्रियांमध्ये दिसून येते. या सवास्न घालत असताना किमान एक तरी मांग स्त्री उपस्थित असावी असा नियम होता.

मांग स्त्रियांना सणासुदीला नाण्हव मिळायचं (डोक्याला लावण्यासाठी तेल या साठी नाण्हव हा शब्द वापरला जातो.) सण वाढून मिळायचा. आसामीच्या घरी लग्न असे तेव्हा मांग स्त्रिया लांब बसून दळण करून देत. त्याचा बाट पाळला जायचा. सारवताना गाडग्याला चुकून हात लागला तर ते फोडून टाकावयाचे तर पितळी तांब्याला हात लागला तर त्यात विस्तव घालून पवित्र करवून घेत. सवर्णांसाठी राखीव असलेल्या विहीरीवर त्यांना पाणी भरण्याचा अधिकार नव्हता, कोणी सवर्णाने पाणी दिल्याशिवाय ते मिळायचे नाही. असामीच्याकडेकधी कधी मातंग स्त्री-पुरुषांसटोपल्यातही पाणी पिण्यासाठी देत.

Copyright © 2020Authors 

ISSN: 0474-9030
Vol-68-Issue-68-January-2020

गावगाड्यात महार स्त्रियाप्रमाणे मांग स्त्रियाही लेकुळीचे काम करीत. लेकुळीपण करणाऱ्या स्त्रियांना असामीच्या घरी जनावराचा गोठा स्वच्छ करणे, शेण काढणे, गोवऱ्या (शेण्या) लावणे, झाडलोट करणे वाड्याचे बाहेरच्या बाजूचे उभे-पुढे सारवण(भिंतीस माती व शेणाच्या पातळ मिश्रणाने) करणे. त्याच बरोबर शेतीचा माल साठवण्यासाठी लागणारे साहित्य हे बांबूच्या किंवा निरगुडीच्या ओल्या फोकापासून बनविलेल्या कणगी असायच्या या कणगी तीन ते पाच किंटल धान्य मावेल एवढ्या मोठ्या असायच्या. या कगणी सारवण्याचे काम त्याना करावे लागे. कणगी प्रमाणे सलाद, कणगुले, मटकुले, वेगवेगळ्या डाली असायच्या त्याही सारवण्याचे काम या स्त्रियांना करावे लागे. हे कामा त्या भाकरीवारी करत. तसेच तिच्या गरजानुसार घराची मालकिन त्याचा मोबदला धान्य रूपाने देत असे. असामीच्या घरच्या लग्न कार्यात मातंग स्त्रीला साडी-चोळी मिळत असे. तिला डोक्याला लावण्यासाठी तेलदिले जात असे. बांगड्या भरल्या जात. लग्नात जेवणावळीच्या पत्रवाळ्या उचलण्याचे कामही त्या करीत. या वेळी त्यांना पत्रावळीवरील राहिलेले जेवण त्या टोपल्यात जमा करीत. या खरकट्यावर त्यांचा हक्क होता. लग्नासाठी लागणारे दळण करणे, मंडप झाडून-झुडून घेणे अशी कामे लेकुळी करीत असे.

दुष्काळात अन्नधान्याचा तुटवडा पडे, उपासमारिची वेळ येई अशा वेळी त्यावेळी हातबल झाल्यावर जनावराच्या मरणाची वाट न बघता जनावराला मारत असू, असे सोजराबाई सांगतात.जनावरांस मारण्याचे प्रकार त्यांनी सांगितले. जनावराच्या जीभेत काटा रूतवायचा, गजग्याचे बी भाकरीत घालून जनावराला खावू घालायचे व जनावर मेले की त्यांच्या भूकेचा प्रश्न काही काळापूरता मिटत असे. जनावर मेले की या स्त्रिया एक वेगळ्या अनोख्या पद्धतीने निरोप इतर स्त्रियांना देत. ‘ठाकण ठोकण घार फिरल तिथे येणे’ अशी सांकेतिक भाषेचा ते वापर करत असत. इतर स्त्रियांना विळा, सुरा घेऊन या असा तो निरोप असावयाचा. ‘जा येशीला (वेशीला) धर पाटलाच्या म्हशीला’ अशी म्हणही त्यांनी मुलाखती दरम्यान सांगितली.

मृत जनावराच्या मांसाची साठवण करण्याची जबाबदारी स्त्रियांवर असायची. जनावराच्या मांसाचे एकदम पातळ लांब असे तुकडे कापायचे. हे तुकडे दोरीवर बांधून त्यावर किंवा काटाड्यावर (बाभळीच्या फांद्याचे काटेरी कुंपण) वाळत घालावयाचे. ते चांगले पक्के वाळले की गाडग्यात भरून ठेवावयाचे. ही वाळलेली मांसाची तुकडे तव्यावर भाजून किंवा शिजऊन खायचे. या मांसाच्या वाळलेल्या तुकड्यांना ‘चान्या’ म्हणत.[13]

आज मांतग समाजात सुधारणा होत आहेत. सोजरबाईला त्यांच्या जातीतील आण्णाभाऊ साठे, लहुजीवस्ताद साळवे, मुक्ता साळवे, बीडचे परिवर्तन चळवळीतील एकनाथ आव्हाड यांची नावे माहित आहेत. या स्त्रिया काम करताना गुढघ्याच्यावर काष्टा घालून लुगड नेसतात. दागिण्याच्या बाबतीत

Copyright © 2020Authors

**ISSN: 0474-9030**
**Vol-68-Issue-68-January-2020**

त्या म्हणाल्या,“कशाचा सोन्याचा दागिना, काळी पोत असायची.” मुलांसोबत मुलींना देखील शिकवले पाहिजे असे त्यांना वाटते. एकंदर बलुतेदारी पद्धती चांगली नव्हती, असे मत त्यांनी नोंदविले.

**निष्कर्ष :**

१) गावगाड्याचा अन्वयार्थ स्पष्ट करताना गावगाड्यांतील स्त्रियांच्या स्थानाविषयी त्यांच्या कामाविषयी संशोधन झाले नाही असे जाणवते.

२) मानवाच्या व्यक्तितत्त्व आणि वैयक्तिक सद्‌गुणांचा विकास यांचे पोषण सुव्यवस्थित अशा सामाजिक संस्थेद्वारेच होऊ शकते. स्त्रियांच्या, त्यातही अस्पृश्य स्त्रियांचा विचार केला तर भारतीय समाजातील गावगाड्यांतील बलुतेदारी या सारख्या सामाजिक संरचनेने स्त्रियांवर अन्यायच केलेला दिसून येतो.

३) मातंग स्त्रियांना गावाच्या सांस्कृतिक परंपरेमध्ये इतर अस्पृश्य स्त्रियांपेक्षा मानपान जास्त आहे जसे की सवास्न घालण्याच्या प्रथेमध्ये एक तरी मांतग स्त्री पाहिजे अशी रूढी आहे,नवरात्रात त्या देवीची उपासना करतात, गावात जोगवा मागतात तेव्हा गावातील सर्व जातीच्या स्त्रिया मोठ्या भावभक्तीने त्यांना जोगवा देतात.

४) जातीच्या व्यवसायातमातंग स्त्रीचे काम मोठे आहे. दोर वळताना गिरका घेण्याचे काम त्या करता, फडे बनवतात.

५) गावगाड्यात दाईचे काम करतात. मांगिणीने बाळाचे कान फुंकणे शुभ मानले जात होते.

**संदर्भ :**

1) गवळी, पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र(संस्था आणि संकल्पना), कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती,2000, पृ. 207.

2) भावे, निलिमा, शिवकालीन स्त्रियांच्या अधिकारकक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती,2010, पृ. 54.

3) आत्रे , त्रिंबक नारायण, गावगाडा (संपा. निसर्गंध प्रभाकर, संपादकीय आवृत्ती, 2011), नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, पृ. 41.

4) लुलेकर प्रल्हाद जी., गावगाड्याचे शिल्पकार, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2009, पृ. 72.

5) लोंढे,सोजराबाई पंडीत, मुलाखत दि. 19/ 10/2017.

6) सोजराबाई पंडीत लोंढे, मुलाखत दि. 19/ 10/ 2017.

Copyright © 2020Authors

**ISSN: 0474-90**
**Vol-68-Issue-68-January-20**

7) नाडगोंडेगुरूनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,पुर्नमुद्रण, 200 पृ.129.

8) सोजराबाई पंडीत लोंढे, मुलाखत दि. 19/ 10/ 2017.

9) उपरोक्त.

10) उपरोक्त.

11) भिसे,रामचंद्र, ग्रामीण मांतंग स्त्री, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, 2016, 33.

12) उपरोक्त, पृ. 34.

13) लुलेकर प्रल्हाद जी, गावगाड्याचे शिल्पकार, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद 2009 पृ. 72.

Copyright © 2020Authors